# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 26.11.2022** **वारः शनिवार**

---

**ठळक बातम्या**

संविधान दिनानिमित्त आज आयोजित कार्यक्रमामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार

राज्यात आजपासून महापरिनिर्वाण दिनापर्यंत ‘समता पर्वाचं आयोजन

पुणे विमानतळावर इंटिग्रेटेड कार्गो टर्मिनल सुरु करणार असल्याची केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांची माहिती

राज्यातील 3 हजार कोटी रूपयांच्या प्रकल्पांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची केंद्राकडे मागणी

आणि

2019, 20 आणि 21 साठीच्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची घोषणा; राज्यातील नामवंत कलाकारांचा समावेश

**पीएम संविधान दिन**

संविधान दिनानिमित्त आज सकाळी 10 वाजता सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या कार्यक्रमामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमामध्ये ई-कोर्ट प्रकल्पांतर्गत विविध नवीन उपक्रमांचा शुभारंभ पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. हा प्रकल्प याचिकाकर्ते, वकील आणि न्यायपालिका यांना माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानाद्वारे सेवा प्रदान करण्याचा प्रयत्न आहे.व्हर्च्युअल जस्टिस क्लॉक,जस्टिस मोबाईल ॲप 2.0, डिजिटल कोर्ट आणि S3WaaS या संकेतस्थळांचा प्रारंभ पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.राज्यात आजच्या संविधान दिनापासून 6 डिसेंबर या

महापरिनिर्वाण दिनापर्यंत सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागानं ‘समता पर्वाचं आयोजन केलं आहे.या कालावधीत राज्यात विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. प्रभात फेरी, संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन,तज्ज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन, कार्यशाळा,निबंध स्पर्धा,प्रश्नमंजुषा,यासह विविध कार्यक्रम होणार आहेत.पुण्यात काल संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला 5 हजार दीप प्रज्वलित करून डॉ.बाबासाहेब  आंबेडकरांना अभिवादन करण्यात आलं.

**ज्योतिरादित्य शिंदे दौरा**

कला,संस्कृतीचं माहेरघर असलेल्या पुण्यात व्यापार,उद्योग,माहिती तंत्रज्ञान आदी क्षेत्रही  विकसित झाली आहेत, त्यामुळे पुण्याच्या विकासाला केंद्र सरकारचं प्राधान्य राहील अशी ग्वाही केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल दिली.पुण्यातील लोहगांव विमानतळावर उभारलेल्या एरोमॉल मल्टीलेवल कार पार्किंगचं उदघाटन काल शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील,खासदार गिरीश बापट,वंदना चव्हाण,आमदार सुनिल टिंगरे यावेळी उपस्थित होते.लोहगांव विमानतळावरून आता आंतरराष्ट्रीय विमानांची उड्डाणे होऊ लागली असून,अमेरिका आणि युरोपसाठी देखील भविष्यात प्रयत्न करण्यात येतील,लोहगाव विमानतळावर नवीन टर्मिनल इमारतीचं काम सत्तर टक्के पूर्ण झाले असून, पुढच्या वर्षी मेपर्यंत ही नवीन टर्मिनल इमारत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल.इथं इंटिग्रेटेड कार्गो टर्मिनलची देखील सुविधा असेल,येत्या 1 डिसेंबरपासून पुणे सिंगापूर विमान सुरू होईल.अशी माहिती ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली.तत्पूर्वी ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल कोल्हापूर जिल्ह्यातील कागल इथं युवा मतदारांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.8 वर्षांपूर्वी भारतीय अर्थव्यवस्था जगात 11 व्या क्रमांकावर होती; येत्या 8 वर्षात ती 5 व्या क्रमांकावर आणण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांना यश आलं असल्याच ते यावेळी बोलताना म्हणाले.

**जीएसटी**

केंद्र सरकारनं यावर्षी एप्रिल ते जूनदरम्यानच्या वस्तू आणि सेवा कराच्या भरपाईपोटी राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांना 17 हजार कोटी रुपयांची रक्कम वितरीत केली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक,उत्तर प्रदेश,दिल्ली आणि तामिळनाडू या राज्यांना मोठी भरपाई मिळाली आहे. महाराष्ट्राला 2 हजार कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत.

**फडणवीस**

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती मिळण्यासाठी राज्य शासनाने केलेल्या सुमारे 3 हजार कोटी रुपयांच्या अतिरिक्त प्रकल्पांच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केली.नवी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या

अध्यक्षतेखाली झालेल्या अर्थसंकल्पपूर्व बैठकीत ते बोलत होते. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड,पंकज चौधरी यांच्यासह विविध राज्यांचे वित्तमंत्री तसेच वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मोठ्या प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी बँकांकडून कर्ज उपलब्ध होत नाही, यासाठी केंद्र सरकारच्या स्तरावर योजना तयार करण्यात यावी, अशी मागणी करत, याचा लाभ महाराष्ट्रासह इतर राज्यांनाही होईल, असं फडणवीस म्हणाले.नवीन 8 ,170 अंगणवाड्यांना मंजुरी मिळावी, आरटीईच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 348 कोटी रुपयांचा निधी मिळावा,तसंच राज्यातील 6 किल्ल्यांच्या संवर्धनासाठी 500 कोटींची रक्कम मिळावी अशी मागणी फडणवीस यांनी यावेळी केली.

**ॲग्रो व्हिजन प्रदर्शन**

13 व्या ॲग्रो व्हिजन प्रदर्शनाला काल नागपूरमध्ये सुरुवात झाली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून गेल्या 12 वर्षांपासून हा उपक्रम राबवला जात आहे.दरवर्षी येणाऱ्या नवनवीन संकल्पना, त्याचा प्रत्यक्ष शेतात वापर, शेतकऱ्यांना झालेला लाभ आदींची माहिती गडकरी यांनी उद्घघाटन प्रसंगी प्रास्ताविकातून दिली. आगामी काळात दाभा इथं 150 कोटी रुपये खर्चून भव्य कन्व्हेन्शन सेंटर उभारण्यात येईल, तसंच वर्धा रोडवर ॲग्रो व्हिजनचं कार्यालय, प्रशिक्षण केंद्र आणि सेंद्रिय उत्पादनांसाठी स्वतंत्र मॉल स्थापन करण्यावर भर देण्यात येणार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं. या कार्यक्रमाला मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराज सिंग चौहान उपस्थित होते. ‘ॲग्रो व्हिजन हे शेतकऱ्यांच राहणीमान बदलण्याचे तंत्र आहे’ अशा शब्दात त्यांनी ॲग्रो व्हिजनचा गौरव केला.

**सीमा प्रश्न**

महाराष्ट्र- कर्नाटक सीमा भागातील विविध संस्था आणि संघटनांच्या बळकटीकरणासाठी राज्य शासनानं महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.या भागातील 865 गावांमधील सामाजिक, शैक्षणिक, धर्मादाय, सांस्कृतिक तसेच निम सार्वजनिक संस्था संघटनांना मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीतून अर्थसहाय देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सीमाप्रश्नी अलिकडेच झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सीमा भागातील मराठी बांधव आणि संस्थाना अर्थसहाय देण्यासंदर्भात सूचना दिल्या होत्या. गुरुवारी या बाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री धर्मादाय निधीसाठी पुढील वर्षासाठी म्हणजे 2023-24 करता १० कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे.

**मुख्यमंत्री दौरा**

राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची शेतकरी आणि कष्टकऱ्यांबरोबर नाळ जोडलेली होती.त्यांच्याच विचारावर राज्य शासन काम करत असून,शेतकर्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला

चांगला भाव मिळावा यासाठी सातारा जिल्ह्यात पाचशे एकर क्षेत्रात कृषी उद्योग उभारण्यात येईल. तसचं कराड विमानतळाच्या विकासासाठी हे विमानतळ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतर करण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल कराड मध्ये केली. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक, पशु-पक्षी प्रदर्शन आणि जिल्हा कृषी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. याचं उद्घाटन एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं.यावेळी ते बोलत होते. सातारा जिल्ह्याचे संपर्कमंत्री शंभूराज देसाई,उद्योगमंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते.तत्पूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त कराडच्या प्रीतिसंगम या समाधीस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं.

**संगीत अकादमी**

संगीत नाटक अकादमीने 2019, 2020 आणि 2021 या वर्षांसाठी संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची काल घोषणा केली. या पुरस्कारासाठी 128 कलाकारांची निवड करण्यात आली आहे. तर कला क्षेत्रातील दहा नामवंत व्यक्तींची अकादमी सहध्यायी म्हणून निवड करण्यात आली आहे.अकादमी सहाध्यायींच्या पुरस्काराचं स्वरूप तीन लाख रुपये आहे;तर ताम्रपत्र,शाल आणि एक लाख रुपये असं अकादमी पुरस्काराचं स्वरूप आहे. हे पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते एका विशेष समारंभात प्रदान केले जातील.राज्यातील विविध नामवंत कलाकारांचा यात समावेश आहे. प्रसिद्ध शास्त्रीय गायिका मालिनी राजूरकर, आरती अंकलीकर टिकेकर, कथक नृत्य गुरु डॉ नंदकिशोर कपोते, शमा भाटे, प्रसिद्ध अभिनेता प्रशांत दामले, दिग्दर्शक कुमार सोहोनी, कठपुतली कला प्रकारात पारंगत असलेल्या मीना नाईक यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.या पुरस्कारांची घोषणा झाल्यानंतर आमच्या प्रतिनिधी स्वाती महाळंक यांनी आरती अंकलीकर टिकेकर, आणि डॉ नंदकिशोर कपोते यांच्याशी संवाद साधत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या .....

**खर म्हणजे हे अवॉर्ड अंनौन्स झालं त्यानंतर माझे गुरुजी पंडित उल्हासकरशाळकर पंडित सुरेश तळवळकर यांचे मला अभिनंदन साठी फोन आले त्यांचे मला फोन आले आणि त्यांनी माझ्या अभिनंदन केलं हे खरं तर मला हे अवॉर्ड मिळाल्यापेक्षाही मोठा अवॉर्ड वाटतं आणि इतकी मोठी गुणी जन आम्ही लहानपणी पहिली त्यांचं संगीत आम्ही अनुभवलं मला अस वाटत एक परमेश्वराची कृपा आमच्यावर त्या कृपेमुळेच मी इथपर्यंत वाटचाल करू शकले आणि मला असं वाटतं की प्रत्येक अवॉर्ड खरंतर हे वचन घेत असतं कलाकाराकडून आणि तुझं की असंच मी सातत्य कायम ठेवीन आणि असंच मी काम करत राहील आणि मी खूप श्रोत्यांची पण आभारी आहे ज्यांनी वेळोवेळी मला पावती दिली माझ्या संगीताला आणि मला प्रोत्साहन दिलं त्यामुळे माझे गुरुजन आणि माझे कुटुंबीय आणि अर्थात परमेश्वर या सगळ्यांच्या कृपेशिवाय हे होणे शक्य नव्हतं**

**आज मला जो नाटकादमी चा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे त्यामुळे मला खरोखर खूप आनंद झालेला आहे हे माझ्या आई-वडिलांचे आणि माझ्या गुरूंचे बिरजू महाराज यांचे आशीर्वाद आहेत माझ्या परिवाराचा**

**पाठिंबा आहे आणि महाराज यांच्या शी माझे जे गुरु शिष्याचं नातं होतं ते जवळजवळ 45 वर्ष होतं आणि आजही महाराजांची आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेत अनेक कार्यक्रमाचे करत राहणाऱ्या युवा कलाकारांसाठी हे त्याच पीठ मी देण्याचा प्रयत्न करतो आहे की त्यांनाही याच्यामध्ये मिळावा निमित्त पुढच्या महिन्यात आम्ही तसाही कार्यक्रम करतो युवा कलाकारांना घेऊन असं भरपूर काम करायची आहेत कथक नृत्य क्षेत्रामध्ये**

बोलणारं झाड

चंद्रपूरच्या वन प्रबोधनीने बोलणारं झाड हा अभिनव उपक्रम राबवला आहे. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वन प्रबोधनीच्या परिसरात नुकतंच या उपक्रमाचं उद्घाटन करण्यात आलं. काय आहे हा उपक्रम ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून -----

**झाडाची संपूर्ण माहिती, त्याचे उपयोग आदी बाबी जाणून घेण्यासाठी चंद्रपूरच्या वन प्रबोधनीने 'टॉकिंग ट्री' म्हणजेच बोलणारं झाड हा उपक्रम राबवून झाडावर त्यासंदर्भातला 'क्यूआर कोड' विकसित केला आहे. या क्यूआर कोडच्या माध्यमातून आता झाड स्वतःच स्वत:बद्दलची माहिती देणार आहे. यामुळे विविध प्रजातींची झाडं आता  मोबाईलद्वारे ओळखता येतील. प्रत्येक प्रजातीची सविस्तर माहिती दृकश्राव्य माध्यमातून उपलब्ध होणार आहे. वन प्रबोधनी परिसरातील प्रत्येक झाडावर पाटी स्वरुपात क्यूआर कोड लावला जाणार आहे. 'टॉकिंग ट्री' या मोबाईल ॲपद्वारे क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर संबंधित झाड स्वत:बद्दल विविध भाषांमध्ये माहिती देणार आहे. प्रबोधनीच्या परिसरात विविध प्रजातींची झाडं आणि परिसरातील जैव विविधतेबद्दल अधिकाधिक माहिती जाणून घेणं यामुळे आता शक्य होणार आहे.आकाशवाणी बातम्यांसाठी पूजा दीक्षित पुणे**

**26/11 – महासंवाद**

देशाची आर्थिक राजधानी आणि देशाच्या सार्वभौमत्वावर झालेला 26/11 चा हल्ला हा कधीही भरून न येणारा घाव आहे; मात्र असे दुःसाहस करणाऱ्यांना सर्वशक्तीनिशी नेस्तनाबूत केले जाईल हे देशाने कृतीतून दाखवून दिले आहे, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुंबईत हॉटेल ताजमहल पॅलेस इथं आयोजित '26/11 मुंबई संकल्प' या कार्यक्रमात ते बोलत होते.

**दीनदयाळ योजना**

जागतिक महिला हिंसाचार प्रतिबंध दिवसाच्या" पार्श्वभूमीवर देशभरात विशेष मोहिमेचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यातील ४ केंद्रांच्या माध्यमातून ही मोहीम राबवली जाणार आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील उमेद अभियान अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या "नवी चेतना लिंगभाव संसाधन केंद्राचा त्यात समावेश आहे. लिंगभेदभावाच्या समस्या ओळखून त्यासंदर्भात समाज प्रबोधन करणं , महिलांचे हक्क आणि अधिकार सुनिश्चित करणं या दृष्टीनं हे केंद्र काम करणार आहे.

**जांबराममूर्ती**

जालना जिल्ह्यातल्या घनसावंगी तालुक्यातल्या जांबसमर्थ इथल्या श्रीराम मंदिरातून चोरीला गेलेल्या मूर्तींचा पुनर्स्थापना सोहळा कालपासून सुरु झाला. दोन दिवसाच्या या भव्य सोहळ्याला संत, महंतांसह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार असल्याची माहिती संयोजक आणि समर्थ मंदिर संस्थानचे उत्तराधिकारी भूषण महारूद्र स्वामी महाराज यांनी दिली.

**संजय राऊत**

पत्राचाळ आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात सहभागी असल्याचा ठपका असलेले शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांचा जामीन रद्द करण्यासाठी सक्तवसुली संचलनालयानं दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी घ्यायला मुंबई उच्च न्यायालयानं नकार दिला आहे. पत्रा चाळ आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ईडीनं संजय राऊत यांना अटक केली होती. सुमारे तीन महिने अटकेत असलेल्या राऊत यांना पीएमएलए न्यायालयानं जामीन मंजूर केला. या जामिनाला स्थगिती मिळावी, यासाठी ईडीनं तात्काळ मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

**हवामान**

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या काही भागात काल दुपारी पावसानं हजेरी लावली. या पावसाचा फटका आंबा, काजू मोहोराला बसण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यातल्या विविध भागातही काल ढगाळ वातावरण होतं. येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**